**प्रेसनोट** **दिनांक ०३/०४/२०१९**

**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**घरातून निघून आलेल्या १३ वर्षाच्या अल्पवयीन मुलीला समुपदेशन करून पुन्हा तिला तिच्या घरी नेऊन, तिचे आई वडीलांचे ताब्यात दिले बाबत.**

---

दिनांक ०२/०४/२०१९ रोजी सायंकाळी १८:०० वा.चे सुमारास रिक्षा चालक नामे- सुभाष घोडके, वय ५३, रा.भोसरी, पुणे यांनी १३ वर्षाची एक अल्पवयीन मुलीस लक्ष्मीनगर पोलीस चौकी येथे नेवून चौकीचे ड्युटी अंमलदार पो.ना. ६८३५ रमेश मेमाणे यांना सदरची मुलगी ही भोसरी, पुणे येथून मला लक्ष्मीनगर येरवडा, पुणे येथे जायचे आहे असे सांगितल्याने मी तिला प्रवासी म्हणून लक्ष्मीनगर येरवडा येथे घेऊन आलो असता, तिने भाड्याचे पैसे दिले नाही अथवा तिला लक्ष्मीनगर येथील कोणताही पत्ता माहिती नसून तेथे तिचे कोणीही नातेवाईक नसल्याचे सांगितल्याने मी तिला पोलीस चौकीत घेवून आलो आहे. असे सांगून सदर मुलीस पो.ना. मेमाणे यांचे ताब्यात दिली. पो.ना. मेमाणे यांनी तिचे नाव पत्त्याबाबत चौकशी केली असता, ती तिचे राहण्याचे पत्त्याबाबत व्यवस्थित माहिती देत नसल्याने, पो.ना. मेमाणे यांनी सदर मुलीस रिक्षा चालकासह येरवडा पो.स्टे.कडील महिला अन्वेषण पथकाच्या महिला पो.उप.निरी. शुभांगी मगदूम यांचेकडे आणून चौकशीसाठी त्यांचे ताब्यात दिले.

म.पो.उप.निरी. शुभांगी मगदूम, पो.हवा. ५३४१ शांतवन साळवे यांनी सदर अल्पवयीन मुलीस विश्वासात घेऊन, तिच्याकडे नाव, पत्त्याबाबत चौकशी केली असता, तिने आपले नाव,वय रा. भोसरी, पुणे असे असल्याचे सांगितले. सदर मुलीस एकटी लक्ष्मीनगर पुणे येथे रिक्षाने येण्याचे कारण विचारले असता, तिने सांगितले की, सुमारे ५ वर्षापुर्वी लक्ष्मीनगर, येरवडा पुणे येथील वसतीगृहात होती. त्यानंतर ती तिचे आई वडीलांकडे भोसरी येथे राहत आहे. दि.०२/०४/१९ रोजी तिचे वडीलांनी तिचे आईशी भांडण करून मारहाण केल्याने आईच्या हाताच्या बोटाला मार लागून रक्त येऊ लागले. त्यामुळे ती घाबरून परत लक्ष्मीनगर येथील वसतीगृहात जाण्यासाठी रिक्षाने आली होती, असे सांगितले.

सदर मुलीने सांगितलेल्या हकिकतीची खात्री करण्यासाठी व तिला तिचे राहते घरी तिचे आई वडीलांचे ताब्यात देण्यासाठी येरवडा पो.स्टे.कडील पो.ना. ६६८६ विठ्ठल खेडकर, पो.शि. १०३१४ गणेश शिंदे, म.पो.शि. ९५४४ धनश्री पाटोळे, असे भोसरी, पुणे येथे सदर मुलीचे राहते पत्त्यावर जावून सदर मुलीचे आई वडीलांकडे चौकशी केली असता, त्यांनी सदर मुलगी त्यांची असल्याचे सांगून ती आज रोजी घरातून रागाच्या भरात काहीएक न सांगता निघून गेली होती, असे सांगितले. सदर मुलीचे व तिचे आई वडीलांचे नात्याबाबत खात्री करून सदर मुलीस तिचे आई वडिलांचे ताब्यात देण्यात आले. मुलगी सुखरूप ताब्यात मिळाल्याने तिचे आई वडीलांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले.

अशा प्रकारे मिळून आलेली अल्पवयीन मुलीस तिचे राहते घरी नेवून तिचे आई वडीलांचे ताब्यात देऊन येरवडा पो.स्टे.कडील म.पो.उप.नि. शुभांगी मगदूम, पो.हवा. ५३४१ शांतवन साळवे, पो.ना. ६८३५ रमेश मेमाणे, पो.ना. विठ्ठल खेडकर, पो.शि.१०३१४ गणेश शिंदे, म.पो.शि. ९५४४ धनश्री पाटोळे यांनी उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.